


REGISTERED No. B. 3434

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १६ पुणें, बुधवार तारीख ११ जानेवारी, १९५० अंक २

श्री श्री श्री श्री श्री

श्री

## दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

युद्धोत्तरकालांत सिंडिकेटच्या सर्वांगीण
वाढीच्या योजना आखल्या जात आहेत.

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के
डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.

श्री श्री श्री श्री श्री

# पांच हॉर्स पावरचें डिझेल एंजीन

घ्यावयाचें म्हणजे तें किर्लोस्कर पीटरच ! संपूर्ण पंपिंग सेटही मिळेल. चौकशी करा.

**केळकर बंधू, बुधवार चौक, पुणें शहर.**


## विविध माहिती

**नाताळाच्या सणाचीं पार्सलें**—१९४९ सालच्या नाताळच्या सणानिमित्त हिंदुस्थानांतून १,५०० पौंड वजनाचीं फळें आणि इतर देणग्या विमानानें इंग्लंडला पाठविण्यांत आल्या. बहुतेक पार्सलें मुंबईच्या व कलकत्त्याच्या नागरिकांनीं पाठविलीं.

**आग विझवणारा- बॉंब**—फिनलंडमधील एका एंजिनिअरनें आग विझवणाऱ्या बॉंबचा शोध लावला आहे. ह्या बॉंबची कसोटी नुकतीच घेण्यांत आली. एका खोलींत पेट्रोलनें भिजविलेलें लांकडी सामान ठेवण्यांत येऊन त्याला आग लावण्यांत आली. ह्या खोलींत आग–विझव्या बॉंबचा स्फोट केल्याबरोबर भडकलेली आग एका क्षणांत विझली.

**मद्रास प्रांतासाठीं तांदूळ**—हिंद सरकारनें संयुक्त प्रांतांतील २५,००० टन तांदूळ मद्रास प्रांताला पुरविण्याचें ठरविलें. आहे. मद्रास प्रांतांतील भाताच्या पिकाचें वादळानें आणि पुरानें फार नुकसान झालें असल्यानें आपणांस ३,००,००० टन तांदूळ पुरविण्यांत यावा अशी मागणी त्या प्रांताच्या सरकारनें केली होती. ही मागणी भागविण्याच्या दृष्टीनें ह्यापूर्वी ३०,००० टन तांदूळ मद्रास प्रांताला पुरविण्यांत आला आहेच.

**अधिक धान्य पिकविण्यासाठीं उत्तेजन**—पूर्व पंजाब सरकारनें अधिक धान्य पिकविण्याच्या मोहिमेला उत्तेजन देण्यासाठीं ४ लाख रुपयांचीं बक्षिसें चालू फडणिशी वर्षांत द्यावयाचें ठरविलें आहे. निरनिराळ्या पिकांसाठीं वेगळीं बक्षिसें ठेवण्यांत आलीं आहेत. जो शेतकरी दर एकरीं ज्यास्तींत ज्यास्त पीक काढून दाखवील, तो बक्षिसास पात्र ठरणार आहे.

**बाटा हिंदुस्थानांत येणार**—थॉमस बाटा हे कॅनेडिअन बुटाचे कारखानदार आपल्या पूर्वेकडील देशांतील कारखान्यांची पहाणी करण्याकरतां लवकरच निघणार आहेत. त्यांच्या मालकीच्या बुटाच्या सर्व कारखान्यांत मिळून २½ कोटी पौंड भांडवल गुंतलेलें आहे. हिंदुस्थानांतील आणि पाकिस्तानांतील आबालवृद्धांना स्वस्त किंमतींत पायतणें पुरविण्याची आपली इच्छा आहे, असें त्यांनीं बोलून दाखविलें.

**देवळें व मठ ह्यांसाठीं कायदा**—देवळें, मठ आणि तत्सम इतर धार्मिक संस्था ह्यांच्या मालमत्तेची व्यवस्था व वापर ह्यासंबंधीं हिंदुस्थान सरकार लवकरच एक कायदा विधिमंडळांत आणणार आहे, असें समजतें.

**हैदराबाद स्टेट बँकेचा नफा**—हैदराबाद स्टेट बँकनें आपल्या भागांवर ५ टक्के कर–माफ नफा जाहीर केला आहे. बँकेनें गांधी स्मारक फंडाला ७५,००० रुपयांची देणगी दिली आहे.

**सैन्यानें केलेली अन्नधान्याची बचत**—हिंदी सैन्यानें अधिक धान्य पिकविण्याच्या मोहिमेंत भाग घेण्यास सुरवात केल्यापासून, मिळणाऱ्या शिध्यापेक्षां कमी शिधा घेऊन २,६२८ मण अन्नधान्याची बचत केली आहे. १५ आक्टोबर १९४९ पर्यंत हिंदी लष्करानें ७,३६२ एकर जमीन लागवडीखालीं आणली. सैन्यानें भात, गहूं, मका इत्यादि पिकें काढलीं.

**श्रम वांचविणाऱ्या यंत्रासाठीं बक्षिस**—पीक कापणें, नांगरणें, बीं पेरणें, तण काढणें इत्यादि शेतीविषयक कामांतील श्रम वांचविणारें यंत्र शोधून काढणारास १,००० रुपयांचें बक्षिस ओरिसाचे गव्हर्नर श्री. असफअली ह्यांनीं जाहीर केलें आहे. हें यंत्र ओरिसांत मिळणाऱ्या साधन–सामुग्रीचें बनविण्यांत यावें आणि त्याची दुरुस्ती आणि बनावट शक्यतों स्थानिक कारागिरांनाच करतां यावी असें असावें, अशी अपेक्षा आहे.

**संयुक्त प्रांतांतील जमीनदारी**—शेतकऱ्योंनीं भूमिदारीचे हक्क मिळविण्यासाठीं आपल्या खंडाच्या १० पट रक्कम भरावी असा कायदा संयुक्त प्रांत सरकारनें केला आहे. संयुक्त प्रांतांतील जमीनदारी नाहींशी करण्यासाठीं १७० कोटी रुपये नुकसानभरपाई द्यावयाची आहे. हा फंड उभारण्याची मुदत आता २८ फेब्रुआरीपर्यंत वाढविण्यांत आली आहे.

**सोन्याचें मूल्य पुन्हा ठरविलें**—ता. ३१ डिसेंबर १९४९ पासून साउथ आफ्रिकन रिझर्व्ह बँकेजवळील सोन्याचें मूल्य दर औंसाला २४८ शिलिंग ह्याप्रमाणें नव्यानें ठरविण्यांत आलें आहे. ह्या नव्या दराप्रमाणें बँकेजवळील सोन्याचें मूल्य ४·५ कोटी पौंड होईल. नवीन दरानें किंमत करण्यापूर्वी बँकेजवळील सोन्याचें मूल्य ३,११,५५,००० पौंड होतें.

**आग्र्याजवळील कांचेचे कारखाने**— फेरोझबादच्या आसपास असणाऱ्या बांगड्यांच्या कारखान्यापुढें फार अडचणीची परिस्थिति उभी राहिली आहे. ह्या परिस्थितीला दोन कारणें जबाबदार आहेत. त्यापैकीं पहिलें, सोडा ॲशची किंमत दर हंड्रेडवेटमागें ४४ रुपये होती ती आतां २२ रुपयापर्यंत खालीं उतरली हें होय. शिवाय, हे कारखाने आळीपाळीनें चालविण्याच्या पद्धतीमुळें हजारों कामगार बेकार झाले आहेत. काळ्या बाजाराला आळा घालण्यासाठीं म्हणून सरकारनेंच ही पद्धत चालू करण्यास लावली होती.

### पेटंट पद्धती बाबत सभा

भारत सरकारच्या उद्योग खात्यानें नेमलेली पेटंट चौकशी कमिटी लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालयानें नुकत्याच उघडलेल्या पेटंट व शोध ह्यांच्या प्रदर्शनास भेट देणार आहे. हिंदी पेटंट पद्धतीच्या सुधारणेबद्दल आस्था असणारे संशोधक व इतर लोक ह्यांची एक सभा म्यूझियममध्यें ( मंडई टॉवर ) शुक्रवार, ता. १३ रोजीं ११ वाजतां बोलावण्यांत आली आहे.

### श्री. श्री. प्र. ओगले ह्यांच्या निधनाबद्दल शोकसभा

श्री. श्रीपाद प्रभाकर उर्फ आत्मारामपंत ओगले ह्यांच्या दुःखद निधनाबद्दल प्रकट शोकसभा मराठा चेंबरच्या वतीनें मंगळवार, ता. १० रोजीं चेंबरचे अध्यक्ष श्री. शंकरराव किर्लोस्कर ह्यांचे अध्यक्षतेखालीं भरली होती.


—सर्व प्रांतांतील—
सुती–गरम–रेशमी
—खादीचें माहेरघर—

# खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २.

# अर्थ

बुधवार, ता. ११ जानेवारी, १९५०





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## रासायनिक कारखानदारांच्या अडचणी

हिंदमध्यें अलिकडे निरनिराळ्या कारणांमुळें कारखानदारांच्या अडचणी वाढत चालल्या आहेत असें दिसतें. कापड व ताग ह्या धंद्यांच्या बाबतींत इतर अडचणींबरोबरच कच्च्या मालाचा पुरवठा ही प्रमुख अडचण आहे. पोलादाच्या धंद्याच्या बाबतींत उत्पादन वाढविण्यासाठीं कारखान्यांत गुंतविण्यासाठीं फार मोठें भांडवल पाहिजे-ही मुख्य अडचण दिसते. जलवहातुकीच्या धंद्याला वाढता खर्च व इतर राष्ट्रांची स्पर्धा तीव्रतेनें जाणवत आहे. रासायनिक धंदे हे संरक्षणाच्या व इतर अनेक धंद्यांच्या दृष्टीनें विशेष महत्त्वाचे आहेत. ह्या धंद्यांचा मूलभूत धंद्यांमध्यें समावेश होतो. अलिकडच्या वृत्तांतावरून असें दिसतें कीं, सरकारनें १९४८ सालीं खुल्या आयातीबद्दल स्वीकारलेलें धोरण रासायनिक धंद्यांच्या प्रगतीच्या प्रामुख्यानें आड आलें. मे १९४९ पासून हें खुल्या आयातीचें धोरण सरकारनें पुन्हा बदललें आहे व अलिकडे रुपयाची किंमत उतरविण्यांत आल्यामुळेंहि आयातीवर परिणाम झाला आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत आंतरराष्ट्रीय व्यापार जवळ जवळ स्थगित झाल्यामुळें कांहीं रासायनिक धंद्यांना आपोआपच संरक्षण मिळालें., परंतु १९४८ मधल्या अनिर्बंध खुल्या आयातीमुळें हिंदच्या मालाचें गिऱ्हाइक तुटलें. सहाजीकच कारखानदारांजवळ न विकला गेल्यामुळें माल पडून राहिला, व परदेशी मालाच्या स्पर्धेमुळें दरहि उतरवावा लागला. असा अनुभव विशेषत: सोडा ॲश व कॉस्टिक सोडा यांच्या बाबतींत आला, असें श्री. जे. आर. डी. टाटा यांनीं टाटा केमिकल्स लि. च्या वार्षिक सभेच्या वेळीं सांगितलें. हिंदमध्यें सोडा ॲशचा वार्षिक खप सुमारें ९० हजार टन होतो, व त्यापैकीं सुमारें ३० हजार टन उत्पादन देशी कारखान्यांतून होतें. तरीहि गेल्या एका वर्षांत सुमारें दोन लक्ष टन पर्यंत सोडा ॲशची आयात डॉलर देशांतून व सहजसुलभ चलनाच्या देशांतून झाली. ह्या आयातीच्या बाबतींत टाटा केमिकल्सच्या अध्यक्षांनीं सरकारला सोडा ॲशची गरजेपेक्षां जास्त आयात करण्यांत येऊं नये असा इषारा दिला असतांहि त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. त्याचप्रमाणें कॉस्टिक सोड्याचा वार्षिक खप ५० ते ५५ हजार टन असतांना, सुमारें एक लक्ष टनांची आयात झाली. यामुळें परराष्ट्रीय व्यापारांतील तूट वाढली, रासायनिक कारखान्यांत बेकारी निर्माण झाली, व धंद्यांत गुंतविलेल्या भांडवलावरहि अनिष्ट परिणाम झाला.

हिंदी रासायनिक कारखानदार संघाच्या वार्षिक अधिवेशनांत भाषण करतांना अध्यक्ष श्री. सेन यांनीं रासायनिक कारखानदारांच्या अडचणींचा उल्लेख केला. त्यांनीं असें सांगितलें कीं, १९२९ सालीं टॅरिफ बोर्डानें सुचविल्याप्रमाणें सुपरफॉस्फेट्स व अमोनियम सुपरफॉस्फेट्स् यांचें उत्पादन वाढविण्याची योजना सुरू करण्यांत आली, व त्यामुळें देशांतील अंतर्गत गरज भागविली जाईल इतक्या प्रमाणापर्यंत उत्पादनाची वाढ झाली आहे. मालाच्या विक्रीसाठी व पुरवठ्यासाठीं 'फॉस्फेटिक पूल' स्थापन करावा असेंहि टॅरिफ बोर्डानें सुचविलें होतें. असा पूल स्थापन करण्यांत आला. परंतु अशा प्रकारचें सहकार्य इतर गोष्टींचे बाबतींत दिसून आलें नाहीं. १९४८ मधील खुल्या आयातीच्या धोरणामुळें अल्कलींच्या धंद्यावर अनिष्ट परिणाम झाला, व औषधें तयार करण्याच्या धंद्यानें हिंदमधील मागणी ७० टक्के पुरविण्यापर्यंत प्रगति केली होती, त्याहि धंद्याला नुकसान सोसावें लागलें व परदेशच्या चढाओढीला तोंड देणें अशक्य झालें. रुपयाची किंमत उतरविण्यांत आल्यामुळें सल्फ्युरिक ॲसिडला लागणारें सल्फर व औषधें तयार करण्याच्या धंद्याला आवश्यक अशीं व्हिटॅमिन्स, सल्फा ड्रग्ज, पेनिसिलिन इ. च्या किंमती वाढल्यामुळें धंद्याला नवीन अडचणींना तोंड द्यावें लागत आहे. इंग्लंड व अमेरिका या देशांत रासायनिक धंद्यांची वाढ करण्यासाठी विशेष लक्ष पुरविण्यांत आलें त्याप्रमाणें हिंदमध्येंहि धोरण ठेवण्यांत आलें पाहिजे. आणखी एक गोष्ट म्हणजे निर्गत व्यापाराच्या दृष्टीनेंहि रासायनिक धंद्याची वाढ करतां येण्यासारखी आहे. तरी याहि दृष्टीनें विचार झाला पाहिजे, असें श्री. सेन यांचें म्हणणें आहे. रासायनिक धंद्याच्या वाढीला विशेष आवश्यक गोष्ट म्हणजे धंद्याच्या हिताकडे लक्ष देऊन परदेशांतून आयात झाली पाहिजे. नको असलेल्या किंवा येथें ज्यामुळें स्पर्धा उत्पन्न होईल अशा मालाची आयात थांबविली पाहिजे. निर्गत व्यापार वाढविण्याच्या दृष्टीनें निर्यातीवरहि बंधनें असतां कामा नयेत.

औद्योगिक संरक्षणाचा प्रश्न हल्लीं कसा बिकट व नाजूक झाला आहे हें रासायनिक धंद्याच्या आजच्या अडचणींवरूनहि कांहींसें स्पष्ट होतें. फिस्कल कमिशनपुढें हा प्रश्न विचारासाठीं आहे. बदललेली अंतर्गत व आंतरराष्ट्रीय परिस्थिति लक्षांत घेऊन औद्योगिक संरक्षणाचा प्रश्न वास्तवतेच्या दृष्टीनें सोडविला जाईल, अशी अपेक्षा आहे.

### मुंबईच्या क्लिअरिंग हाउसमध्यें आलेले चेक

बॉंबे बँकर्स क्लिअरिंग हाउसमध्यें १९४८ च्या मानानें १९४९ सालीं ज्यास्त चेक आले, परंतु त्यांची रकम कमी भरून दर चेकची सरासरी रकमहि उतरली. खालील आकडे पहा:—

| वर्ष | चेक्सची संख्या | रकम (रु.) | चेकची सरासरी रकम (रु.) |
|---|---|---|---|
| १९४८ | ९०,०२,६३५ | २७ अब्ज, १२·६ कोटी | ३,०१२ |
| १९४९ | ९२,९२,६५२ | २६ अब्ज, १२·२ कोटी | २,८११ |

### बँक ऑफ इंडियाचा नफा

बँक ऑफ इंडिया लि. ला १९४९ सालीं ७६,४३,०६४ रु. नफा झाला. १४% करमाफ डिव्हिडंड जाहीर होणार आहे.

### बागलकोट सिमेंट कं. लि.

विजापूर जिल्ह्यांत बागलकोट येथें सिमेंटचा कारखाना काढण्यासाठी वरील कंपनी स्थापन झालेली आहे. कंपनीचें अधिकृत व विक्रीस काढलेलें भांडवल १ कोटी रुपयांचें असून त्यापैकीं ४५ लाखांचे भाग २३ लोकांनीं अंडरराइट केले आहेत. त्यांना त्यांच्या त्यांच्या विभागांसाठीं १० वर्षांची एजन्सी देण्यांत आली आहे.

## युद्धकाळांतील कामासाठीं बोनस आत्तां देवविला

### टिटाघर गिरणी वि. कामगार ह्यांच्या वांध्याचा निवाडा

टिटाघर पेपर मिल्स कं. लि. व तिचे कामगार ह्यांचेमधील वांधा इंडस्ट्रिअल ट्रिब्यूनलकडे सोपविण्यांत आला होता. ट्रिब्यूनलचा निवाडा नुकताच प्रसिद्ध झाला आहे, तो कारखानदारांच्या दृष्टीनें महत्त्वाचा आहे. वांधा मिटविण्यासाठीं कांहींतरी कारणमीमांसा लढविण्याचा ट्रिब्यूनलचा कसा प्रयत्न असतो, हें त्यावरून दिसून येईल. टिटाघर कामगारांच्या तीन मागण्या होत्याः— ( १ ) युद्धकाळांतील प्रत्येक महिन्याचा एक दिवस ह्याप्रमाणें ७२ दिवसांचा विलंबित बोनस, ( २ ) १९४५ व १९४६ चा प्रत्येकीं एका महिन्याचा बोनस, आणि ( ३ ) १४ मार्च, १९४७ ते २७ मार्च, १९४७ ह्या संपाच्या मुदतीचा पगार.

कामगारांचें म्हणणें असें, कीं कंपनीनें युद्धकाळांतील कठीण परिस्थितीमधील कामाबद्दल कामगारांची भरपाई करण्याचें आश्वासन दिलें होतें. तागाच्या गिरण्यांतील कामगारांना त्यासाठीं बोनस दिलेला होता. कारखान्याच्या मॅनेजरनें आश्वासन दिलें होतें असें सांगण्यांत आलें, परंतु तें सिद्ध झालें नाहीं व ७२ दिवसांच्या पगाराइतक्या बोनसचें कंपनीचें वचन तर ट्रिब्यूनलला आढळून आलेंच नाहीं. ही गोष्ट पटली तरी विलंबित बोनस देण्यासाठीं इतर कारणें ॲडज्युडिकेटर शोधूं लागला. बंगाल दुष्काळ कमिशनचा रिपोर्ट, कंपनीचे ताळेबंद, इंपीरिअल केमिकल कंपनीच्या तिच्या मुंबईच्या नोकरवर्गाशीं वांध्यांतील सर दिवेटिया ह्यांचे उद्गार, इत्यादींचा आश्रय घेऊन "तागाच्या गिरण्यांतील कामगारांप्रमाणें टिटाघर पेपर मिल्सच्या कामगारांना सात आठवड्यांच्या पगाराइतका विलंबित युद्ध–बोनस देण्यांत यावा," असा त्यानें निवाडा केला. कागदाचे कारखाने, इंजिनिअरिंग, इत्यादि धंद्यांपेक्षां तागाच्या कारखान्यांत मुळांतच मजुरी कमी होती आणि कित्येक तागाच्या गिरण्या व मॅनेजर हलक्यांना बळी पडण्याजोग्या होत्या, म्हणून तेथील कामगारांना मुद्दाम खास बोनस देऊं केला होता. जेव्हां जेव्हां "इषारा" मिळाला तेव्हां तेव्हां कागदाच्या गिरण्यांतील आवश्यक कामगारांनाहि "इषारा बोनस" देण्यांत आला होता.

१९४५ व १९४६ ह्या वर्षांचा प्रत्येकीं एक महिन्याचा बोनस कामगारांनीं मागितला, त्याचें कारण कारखान्याचा युद्धकाळांतील वाढता नफा हें होय. रिझर्व्ह फंडांत मोठाल्या रकमा टाकल्या, तरी यंत्रसामुग्री बदलण्यास व नवी घेण्यास ३० लक्ष रुपये कमीच पडत आहेत; ज्या वर्षांचे हिशेब पुरे झालेले आहेत, अशा वर्षांकरितां बोनस आतां देण्याचें तत्त्व कंपनीस मान्य नाहीं, इत्यादि मुद्दे कंपनीनें पुढें मांडले. त्याबरोबरच, ह्या पुढें मात्र उत्पादनाशीं प्रमाणबद्ध असा बोनस देण्यास तिनें संमति दर्शविली. तथापि ॲडज्युडिकेटरनें १९४५ व १९४६ ह्या वर्षांचा बोनस देवविला. संपाचे मुदतीमधील वेतनाच्या मागणीसही त्यानें संमति दिली. अशा रीतीनें, आधीच्या वर्षांच्यासाठीं बोनस देण्याची जबाबदारी कंपनीवर पडली. टिटाघर कंपनीच्या संबंधांतील ह्या निवाड्यांतील "तत्त्व" सर्वच कारखानदारांना गैरसोईचें वाटेल.

---

### उद्बोधक उद्गार

**"कामगारांनीं ज्यास्त तास काम केलें, तरच उत्पादन वाढेल."**

"आर्थिक सिद्धांत व्यक्तीप्रमाणेंच राष्ट्रांनाहि लागू असतात. आपत्तीचे प्रसंगीं व्यक्ति खर्च कमी करते आणि ज्यास्त वेळ काम करून प्राप्ती वाढविते. देशाच्या गरजा लक्षांत घेतां, खर्च कमी करण्यास भारतामध्यें फारसा वाव नाहीं. तेव्हां, अधिक काम करण्याचाच मार्ग काय तो उरतो. कांहीं वर्षें तरी भारतामध्यें नवी यंत्रसामुग्री उभारून उत्पादनक्षमता व उत्पादन वाढविणें सध्याइतकेंच काम करून शक्य होणार नाहीं. तेव्हां अमेरिका, ग्रेट ब्रिटन, इत्यादि देशांमधील कामगारांच्या कामाच्या तासांचें येथें अनुकरण करणें सोइस्करहि नाहीं व इष्टहि नाहीं. भारताला आपलें औद्योगिक उत्पादन वाढविलें पाहिजे आणि त्यासाठीं साप्ताहिक कामाचे तास ज्यास्त केलेच पाहिजेत. हिंदी कामगारांनीं आपण होऊन पुढें येऊन जादा काम करण्यास तयार व्हावें. जादा कामाबद्दल त्यांना नेहेमीची मजुरी मिळावी आणि जरूर तर ह्या जादा उत्पादनामुळें होणारा नफा कारखानदारांकडून सरकारनें घेऊन त्यांना समाधानहि द्यावें; परंतु उत्पादन जरूर वाढावें.":— **सर चुनीलाल भाईचंद मेथा.**

---

### भारत–पाकिस्तान तेढीचा इतरांवर परिणाम

भारत आणि पाकिस्तान ह्यांचेमधील आर्थिक संबंध वाढत्या प्रमाणांत बिघडत चालले आहेत, त्याकडे ग्रेट ब्रिटनमधील कापडाचे धंदेवाले काळजीपूर्वक लक्ष देत आहेत. ह्या दोन देशांतील मालाच्या येजामध्यें व्यत्यय आल्यानें इतरहि देशांवर परिणाम होतो; व्यापाराचे नवे ओघ निर्माण होतात. पाकिस्तानाजवळ पूर्वीपेक्षां अधिक कपास शिल्लक राहिली तरी तिचा उठाव मात्र सुलभतेनें होऊं शकत नाहीं; कारण पाकिस्तानी रुपयाची पूर्वीचीच किंमत कायम राखण्यांत आलेली आहे. हिंदी कापडाची पाकिस्तानकडे निर्गत कमी झाल्याकारणानें इतर देशांत त्याची लँकेशायरच्या व जपानच्या कापडाशीं स्पर्धा होणें स्वाभाविक आहे. कित्येक ब्रिटिश फर्म्सनीं हिंदी कापडाच्या खरेदीचे करार केले आहेत. हें कापड आणून तें 'फिनिश' करण्यांत येईल व त्याची पुनः निर्गत केली जाईल.":—

**मँचेस्टर गार्डिअन**

---

### बनावट नोटांत १० रुपयेवाल्या नोटा ज्यास्त

इतर नोटांपेक्षा दहा रुपयेवाल्या नोटा बनावट करण्याकडे "तज्ञां"चें अधिक लक्ष असतें! १९४८–४९ मध्यें त्या नोटांची संख्या कमी झाली तरी त्यांचें पुढारीपण कायम आहे. रिझर्व्ह बँकेकडे आलेल्या बनावट नोटांचा तपशील खालीं दिला आहेः—

| वर्ष | नोटांची संख्या | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | १ रु. | २ रु. | ५ रु. | १० रु. | १०० रु. |
| १९४६–४७ | १,५३७ | २५० | ८३१ | ७२२९ | १३ |
| १९४७–४८ | १,५७४ | १५९ | १६६७ | १०,२३८ | १९ |
| १९४८–४९ | २,५०० | १७६ | १९४५ | ६,५७४ | २४ |

बँकेकडे आलेल्या एकूण ११,२२० बनावट नोटांपैकीं ६,५७४ म्हणजे ५८.६% नोटा १० रुपयेवाल्या होत्या.

## आपणांपुढील शेतकीविषयक महत्त्वाचे प्रश्न

( श्री. के. व्ही. जोशी, एम्. एजी., ऑ. जनरल सेक्रेटरी, डे. अॅ. असोसिएशन )

आतां आपला देश स्वतंत्र झाला आहे. मध्यवर्ती व प्रांतिक सरकारें लोकनियुक्त मंत्रिमंडळांचीं बनलेलीं आहेत. अशावेळीं देशांतील शेतीच्या निरनिराळ्या अंगांचा योग्य विकास करण्याच्या योजना जनहितबुद्धीनें, व्यापक दृष्टीनें व स्वतंत्रपणें विचार करून आंखून त्या सरकारला सादर करून त्याचा फायदा जनतेला शक्य तितक्या लवकर मिळण्याबद्दल खटपट करणारी व त्या योजना प्रत्यक्ष व्यवहारांत उतरविण्याकरितां त्या त्या भागांतील शेतकऱ्यांची संघटना करणारी व सरकारनें आंखलेल्या ग्रामीण प्रदेशाच्या विकास-योजना काळजीपूर्वक अभ्यासून त्यावर अधिकारयुक्त वाणीनें व निर्भीडपणें मत देणारी अशी स्वतंत्र व वजनदार संस्था असणें अत्यंत जरूर आहे. ही कामगिरी डेक्कन अॅग्रिकल्चरल असोसिएशनसारखीच संस्था करूं शकेल, कारण तिच्या प्रमुख कार्यकर्त्यांत शेतकी व सहकार, सार्वजनिक बांधकाम व पाटबंधारे, शिक्षण, वैद्यक, महसूल वगैरे सरकारी खात्यांत वरिष्ठ जागांवर काम केलेले राष्ट्रीय वृत्तीचे सेवानिवृत्त तज्ज्ञ व स्वतंत्रपणें विचार करणारे अर्थशास्त्रज्ञ, समाजसेवक व प्रत्यक्ष शेती करणारी मंडळी आहेत.

सध्यां आपणांपुढें शेतकीविषयक बरेच महत्त्वाचे प्रश्न आहेत त्यांपैकीं कांहींचा निर्देश करीत आहे:—

( १ ) अन्नधान्याचे बाबतींत महाराष्ट्र स्वयंपूर्ण होण्याकरितां जमीन व पाणी या निसर्गसाधनांचा भरपूर उपयोग करण्याच्या योजना आंखून त्या प्रत्यक्ष अमलांत आणण्याची तजवीज करणें.

( २ ) जमिनीचें फूल अनिर्बंधपणें सालोसाल वाहून गेल्यानें महाराष्ट्रांतल्या जमिनी फार विस्तीर्ण प्रमाणांत निकृष्ट व हलक्या बनल्या आहेत व बनत आहेत. त्यामुळें जो कांहीं थोडाफार पाऊस पडतो तोही शोषून घेऊन तें पाणी पिकांचे वाढीकरितां सांठवून धरण्याकरितां पुरेसा मातीचा थर जमिनीवर राहिलेला नाहीं, यामुळेंही पिकें येत नाहींत. ही परिस्थिति बदलून जमिनीचा मगदूर सुधारण्याकरितां समपातळीवर सार्वत्रिक बांध घातले पाहिजेत. हें काम अन्नधान्याच्या वाढत्या पैदाशीलाही पुष्कळच पोषक ठरणार आहे. म्हणून हें शक्य तितक्या थोड्या मुदतींत नियोजनपूर्वक होणें जरूर आहे.

( ३ ) महाराष्ट्राचा फार मोठा भाग दुष्काळी आहे. या भागांतील शेती अपुऱ्या व लहरी पाऊसमानावर अवलंबून असल्यानें शेतकऱ्यांची होणारी दैन्यावस्था व असुरक्षितता दूर करण्याकरितां सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांत अनेक धरणें बांधून त्यांतून मोठमोठाले कालवे काढून त्यांचें दुष्काळी भागांत सर्वत्र जाळें पसरविणें हा एकच चिरफलदायी उपाय आहे. हे पाटबंधारे बांधण्याच्या कामाला प्राधान्य देऊन योजनापूर्वक थोड्या वर्षांचे मुदतींत ते बांधण्याबद्दल सरकारला निकड लावणें. या कालव्यांमुळें अन्नधान्याची पैदास पुष्कळच वाढून ती हुकमी पद्धतींत पडेल.

( ४ ) महाराष्ट्रांत दुधाचा जवळ जवळ अभावच आहे असें म्हटलें तरी चालेल आणि दूध तर राष्ट्रांतील नवीन पिढ्यांचें योग्य संवर्धन होण्यास मुबलक मिळणें अत्यंत आवश्यक आहे. महाराष्ट्रांत दुधाळ गाई-म्हशींच्या नामवंत जाती नाहींत. दुधाळ जनावरांचे बाबतींत महाराष्ट्रांत स्वयंपूर्णता आणणें व शेळ्यापाड्यांतून दुधाचा मुबलक पुरवठा करणें अत्यंत जरूर आहे. वरीलप्रमाणें महाराष्ट्राच्या दुष्काळी जिल्ह्यांतून जर पाटबंधाऱ्यांचें सर्वत्र जाळें पसरलें गेलें तर दुधाचा प्रश्न सोडविणें अत्यंत सोपें होणार आहे. या दुष्काळी जिल्ह्यांची हवा जनावरांचे वाढीला अत्यंत अनुकूल आहे. दुधाळ जनावरें ठेवल्यानें शेतीउत्पादनाच्या दुय्यम पदार्थांचा ( वैरण, भूस वगैरे ) किफायतशीर उपयोग होऊन शेतीकरितां शेणखताचा पुरवठा वाढेल व शेतीला लागणारे बैल व टोणगे हेही मिळतील.

वर दिग्दर्शित केलेले व इतर अनेक सार्वत्रिक लागू पडणारे प्रश्न आपणांपुढें आहेत. ते सोडविण्याकरितां त्या प्रत्येक विषयाचा सांगोपांग अभ्यास करून योजना आखणें व त्याला जनतेचा पाठिंबा मिळविणें हें काम डेक्कन अॅग्रिकल्चरल असोसिएशन या महाराष्ट्रांतील मध्यवर्ती संस्थेनें जास्त जोमानें करण्याचें ठरविलें आहे. हें काम फार मोठं आहे व तें समाधानकारक करणें झाल्यास असोसिएशनच्या सभासदांची संख्या पुष्कळच वाढली पाहिजे. म्हणून शेतकी व ग्रामीण भागांशीं संबंध असलेल्या तज्ज्ञ, अनुभवी व प्रत्यक्ष शेती करणाऱ्या व देशाच्या प्रगतीकरितां अहोरात्र निदिध्यासानें काम करणाऱ्या महाराष्ट्रांतील मंडळींनीं या संस्थेचे मोठ्या प्रमाणांत सभासद होऊन ही संस्था जास्त कार्यक्षम व उपयुक्त केली पाहिजे. संस्थेचें मुखपत्र " शेती आणि शेतकरी " हें मासिक आज सतत ३९ वर्षें विनाखंड सतत चालू असून शेती सुधारणेचा प्रसार करीत आहे.

---

### दि होप कंपनी लि., पुणें २.

वरील कंपनी नोव्हेंबर १९४९ मध्यें स्थापन झाली असून तिचे मुख्य उद्देश साबण निर्मिती, खरेदी विक्रीचे सर्वसामान्य व्यवहार करणें व फर्निचर तयार करणें इ. आहेत. कंपनीच्या कामास प्रारंभ झाला आहे. श्री. एस. बी. जोगळेकर हे कंपनीचे संस्थापक व मॅनेजिंग डायरेक्टर आहेत. कंपनी रु. १०० पासून ठेवी स्वीकारते व ठेवीदारांना जास्त सवलती देते, हें तिचे वैशिष्ट्य आहे.

---

### साभार पोंच

**किर्लोस्कर बंधु लि. चें कॅलेंडर**

हें नेहेमीप्रमाणें आकर्षक असेंच आहे.

**अ. वि. गृहाचें कॅलेंडर**

ह्यांत नेहेमीचीं वैशिष्ट्यें आहेत. संस्थेचे माजी विद्यार्थी व जाणते लोक ह्यांची संस्थेस मदत होत आहे. योग्य दानधर्मांचें ठिकाण दाखविण्याचें काम कॅलेंडर उत्कृष्ट रीतीनें करील.

**खादी मन्दिर, पुणें चें कॅलेंडर**

म. गांधींच्या रंगीत चित्रानें कॅलेंडर सजविलेलें आहे.

---

श्री.

**दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि.**

९८० सदाशिव पेठ, लक्ष्मी रोड.

पुणें २.

## विनंति

ता. ७ फेब्रुवारी १९५० चे सुमारास सिंडिकेटच्या भागीदारांकडे त्यांची डिव्हिडंड वॉरन्टस रवाना करण्यांत येतील. तरी ज्या भागिदारांचे पत्ते बदललेले असतील त्यांनीं आपले बदललेले पत्ते सिंडिकेटचे ऑफिसांत कळविण्याची विनंति आहे.

सी. जी. आगाशे अॅण्ड को.

मॅनेजिंग एजंटस्

## सहकारी कार्यकर्त्यांचा अभिनंदनीय निर्णय

( लि. आ. म. )

गुरुवार ता. २२-१२-१९४९ रोजीं सांगली स्टेट सेंट्रल को. बँकेच्या ऑफिसांत मे. बी. पी. पटेल, रजिस्ट्रारसाहेब को. सोसायटीज यांचे अध्यक्षतेखालीं वारणा व्हॅली को. खरेदीविक्री संघ, सांगली गणपती को. खरेदीविक्री संघ, सांगली स्टेट सेंट्रल को. ऑ. बँक व सातारा जिल्हा को. लँड मॉर्गेज बँकेचे कार्यकर्ते याशिवाय सभेस सातारा भागचे डेप्यूटि रजिस्ट्रार मे. कारखानीस, असि. रजिस्ट्रार मे. सूर्यवंशी व दे. भ. वसन्तराव पाटील, दत्तोबा सूर्यवंशी, आर. पी. पाटील इ० मंडळी हजर होती. दुपारी दोन वाजतां सभेस सुरवात होऊन अत्यंत गुंतागुंतीचे व महत्त्वाचे विषयावर वाटाघाट होऊन अंतिम निर्णय घेण्यांत आले. सातारा जि. को. लँड मॉर्गेज बँक लि. कराड या बँकेस दोन्ही जिल्ह्यांचें जत, मिरज तालुक्यासह सर्व कार्यक्षेत्र द्यावें असें द. भागच्या जमलेल्या कार्यकार्त्यांनीं आनंदानें कबूल केलें. बँकेचे हेड ऑफीसच सांगलीस आणावें या बाबतींत कांहीं कार्यकर्त्यांचा प्रथम प्रथम आग्रह दिसून आला, परंतु मे. रजिस्ट्रारसाहेब, मे. चेअरमन आ. ना. कल्याणी व डायरेक्टर्स मे. राजाज्ञा व मे. गोगटे यांनीं या बँकेचे व्यवहारांस व्याजाचे दर कमी असून भांडवल पुरविणाऱ्या मध्यवर्ती बँकेचें व्याज भागवून राहिलेल्या मारजिनमधून बँकेचा खर्च भागविण्यास अत्यंत कठीण जातें व हें कामही फारच जबाबदारीचें व महत्त्वाचें असल्यानें अत्यंत कसोशीनें करावें लागतें असा खुलासा केल्यानंतर दे. भ. वसन्तराव पाटील, आर. पी. पाटील, श्री. दत्तोबा सूर्यवंशी या मंडळींनीं आग्रह सोडून सांगलीस एक लँड मॉर्गेज बँकेचें ऑफिस असलें तरी चालेल, जेणेंकरून लोकांची सोय झाली म्हणजे झालें, असें बोलून दाखविलें. नंतर सांगलीस या बँकेचें एक ऑफीस उघडण्याचें ठरवून अत्यंत महत्वाचा निर्णय येण्यांत आला. बँकेचे आजपर्यंतचे कामाबाबत कोणाचेंच दुमत नसल्यानें कार्यकर्त्यांनीं ऑगस्ट १९४८ पासून अत्यंत परिश्रमपूर्वक चालविलेल्या या प्रयत्नास अखेर यश मिळालें. दोन्ही जिल्ह्यांत आपले व्यवहार करण्यास सातारा जि. को. लँड मॉर्गेज बँकेस वाव मिळाला असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं.

## टांकसाळींत पाडलेलीं नाणीं

१९४८-४९ मध्यें मुंबई व कलकत्ता येथील टांकसाळींत पाडलेल्या रुपयांच्या व इतर नाण्यांचा तपशील खालील तक्त्यांत दिला आहे:—

| नाणें | मुंबई टांकसाळ | कलकत्ता टांकसाळ | एकूण |
|---|---|---|---|
| | रु. | रु. | रु. |
| रुपया (निकेल) | ५,४२,५६,००० | | ५,४२,५६,००० |
| अधेली ,, | १,१९,६०,००० | | १,१९,६०,००० |
| पावली ,, | १,१०,००,००० | | १,१०,००,००० |
| चवली ,, | २८,८८,५०० | २०,२९,००० | ४९,१७,५०० |
| आणेली ,, | १४,४९,२५० | ३४,१३,७५० | ४८,६३,००० |
| अर्धा आणा ,, | ४,४७,५०० | २४,२०,७५० | २८,६८,२५० |
| पैसा | २,९९,२०० | ११,०९,४०० | १४,०८,६०० |
| एकूण | ८,२३,००,४५० | ८९,७२,००० | ९,१२,७२,३५० |

जानेवारी १९४८ मध्यें सुरू केलेलें, पाकिस्तानी नाणीं पाडून देण्याचें काम ऑक्टोबर १९४८ मध्यें बंद केलें.

## विमा व्यवसायाचा वार्षिक आढावा

( ३ )

### आयुर्विमेतर काम

आयुर्विम्याव्यतिरिक्त इतर विमा-प्रकारांत भारतीय विमा-संस्थांचे हप्त्याचें एकूण उत्पन्न ९·२८ कोटी रु. होतें. यांपैकीं ५·०२ कोटी रु. आग, १·७८ कोटी रु. सागरी व २·४८ कोटी रु. इतर प्रकारच्या विम्यांचें होतें.

परदेशी विमा-संस्थांचें भारतांतील या प्रकारांतील एकंदर हप्त्याचें उत्पन्न पुढीलप्रमाणें होतें. आग-२·३७ कोटी रु. सागरी १·८७ कोटी व संकीर्ण १·५५ कोटी रु.

भारतीय व परदेशी विमा-संस्थांच्या हप्त्यांच्या एकूण उत्पन्नाशीं हकपूर्तीचें प्रमाण आगीच्या विम्यांचे बाबतींत ३२ टक्के, सागरी विम्याचे बाबतींत ५१ टक्के आणि इतर प्रकारांचे बाबतींत ३६ टक्के होतें. १९४७ मधील हेंच आंकडे अनुक्रमें ३४, ४८ व ३५ होते.

एकंदर हप्त्यांच्या उत्पन्नांचीं अडतीचीं प्रमाणें, आगीच्या बाबतींत २२, सागरी विम्याचे बाबतींत १२ व इतर प्रकारांत १६ टक्के अशी होती. आगीच्या विम्याच्या बाबतींत १९४७ मध्यें तें २१ टक्के होतें व बाकीच्या दोन वर्गांचे बाबतींत जवळ जवळ तेंच होतें.

### सरकारी व सरकारमान्य कर्जरोख्यांत गुंतविलेलें भांडवल

विमा कायद्याच्या २७ व्या नियमानुसार आयुर्विमा संस्थांच्या गुंतविलेल्या पैशांसंबंधी केलेल्या चौकशींत ३१ डिसेंबर, १९४८ रोजीं एकंदर विमा-देण्यापैकीं ८५ टक्के रकम सरकारी व सरकारमान्य कर्जरोख्यांत गुंतविली असल्याचें आढळून आलें. कायद्यानें फक्त ५५ टक्केच भांडवल गुंतविलें पाहिजे असें बंधन आहे.

### प्रतिनिधी प्रमाणपत्रें

१९४८ मध्यें एकंदर १,७०,०१६ प्रतिनिधी प्रमाणपत्रें देण्यांत आलीं. यांपैकीं ३६,२८४ म्हणजे सुमारें २१ टक्के स्त्री-प्रतिनिधी होते. ( समाप्त )

## सहकारी चळवळ आणि रिझर्व्ह बँक

"रिझर्व्ह बँकेकडून सहकारी बँकांना ३% वजा १½% रिबेट = १½% दरानें कर्जें मिळूं शकतात, परंतु ह्या कर्जाच्या मर्यादा रिझर्व्ह बँक कायद्यानें घालून दिलेल्या आहेत. मोसमी शेतकाम व पिकांच्या मार्केटिंग पुरतेंच कर्ज देतां येतें. शेतीच्या पिकांतून दूध, लोणी, तूप, लोकर इत्यादि वगळलेलीं आहेत. साखर, जिन व प्रेस केलेली कपास, शेंगदाणे, तेलें व पेंड ह्यांचाहि त्यांत समावेश होत नाहीं. रिझर्व्ह बँक कायद्याचे कक्षेंत ह्या सर्व जिनसांचा समावेश व्हावा, ह्या दृष्टीनें त्याची दुरुस्ती करण्यांत आली पाहिजे. इंडस्ट्रिअल को. सोसायट्यांच्या व्यवहारांसहि कायद्यानें वगळलेलें आहे; अर्थात त्यांनीं तयार केलेल्या मालाच्या विक्रीसाठीं १७४ (ड) कलमाखालीं कर्जें मिळूं शकतील. परंतु त्यांच्या इतर व्यवहारास रिझर्व्ह बँक कर्ज देऊं शकत नाहीं. सहकारी सोसायट्यांच्या कायद्यानें मान्यता दिलेल्या सर्व सहकारी व्यवहारांस रिझर्व्ह बँकेकडून कर्ज मिळूं शकावें अशी सूचना करण्यांत येत आहे. सोसायट्यांच्या रजिस्ट्रारांच्या परिषदेच्या शिफारसीवरून हिंदुस्थान सरकारनें माझ्या अध्यक्षतेखालीं सहकारी सब कमिटी नेमली होती. तिनें वरील प्रश्नांबाबत सूचना केलेल्या आहेत. त्या सरकार सत्वर अंमलांत आणील अशी आशा आहे." २७ व्या मद्रास प्रां. सहकारी परिषदेचे अध्यक्ष, श्री. आर. जी. सरय्या, ओ. बी. ई., ह्यांचें भाषण.

## शेतकरी वर्गामध्यें औद्योगिक वातावरण निर्माण करण्याची आवश्यकता

( मा. म. काळे. )

दुसऱ्या महायुद्धामुळें निर्माण झालेल्या परिस्थितीचा विचार केला असतां शेतकरी वर्गाच्या हातांत राष्ट्रीय वार्षिक उत्पादनाचा तुलनात्मकरीत्या जास्त भाग गेला ही गोष्ट सर्वमान्य आहे. याचें कारण असें कीं, चलनविस्तार व इतर कारणें यामुळें इतर वस्तूंचे बाजारभाव साडेतीन ते चार पट वाढले, परंतु शेती मालाचे बाजारभाव मात्र पांच ते सहा पट वाढले. शेती मालाचे बाजारभाव जास्त प्रमाणांत वाढण्याचें मुख्य कारण म्हणजे शेती माल जीवनविषयक गरजांत प्रथम येतो, व युद्धजन्य परिस्थितीमुळें जागतिक शेती मालाचें उत्पादन घटल्यामुळें जगांत बहुतेक सर्व देशांतच धान्यविषयक विक्रांना तीव्र मागणी येऊन त्यांचे बाजारभाव शक्य तितके उच्च पातळींत राहिले. हिंदमध्यें अन्नधान्याच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळें हे भाव अजूनहि निश्चितपणें उतरण्याचें चिन्ह दिसत नाहीं.

शेतकरी वर्गाच्या हातांत जास्त पैसा जाऊन गेल्या चारपांच वर्षांत तो वर्ग आर्थिक दृष्ट्या सावरत चालला आहे, ही गोष्ट केव्हांहि स्पष्ट आहे. ईस्टर्न एकॉनॉमिस्टनें गेल्या वर्षी केलेल्या संशोधनाप्रमाणें १९३९–४० सालीं हिंदच्या एकंदर उत्पादनांत शेती मालाचें प्रमाण ४९·२ टक्के होतें, तर १९४७–४८ सालीं तेंच प्रमाण ५७·३ टक्के होतें. याच काळांत उद्योगधंद्यांच्या व तत्सम इतर उत्पन्नाचें प्रमाण शेंकडा ८ या प्रमाणांत घटलें आहे.

शेतकरी वर्गाच्या हातीं जास्त पैसा आल्यामुळें त्या वर्गानें आपलीं कर्जें कांहीं प्रमाणांत फेडलीं, कांहीं थोड्यांनीं नवीन जमिनी खरेदी केल्या, व कापड किंवा इतर चैनीचा माल यांत जास्त पैसा खर्च केला. परंतु शेतकरी वर्गाचा पैसा आठ टक्के या प्रमाणांत वाढला तरी पैसा शिल्लक टाकून तो बँकेंत टाकणें किंवा औद्योगिक कंपन्यांच्या शेअर्समध्यें गुंतविणें अशा गोष्टी शेतकरी वर्गानें मुळींच केल्या नाहींत. गेलीं तीन वर्षे हिंदमध्यें औद्योगिक भांडवलाची टंचाई तीव्रपणें भासत आहे. त्याचें एक प्रमुख कारण शेतकरी वर्गाच्या हातांत खेळणारा परंतु उद्योगधंद्यांत भांडवलाच्या रूपानें गुंतविला न जाणारा पैसा होय, असें सांगण्यांत येतें.

खेडेगांवांतील परिस्थितीचें निरीक्षण केल्यास वरील विधान खरें आहे असेंच दिसतें. या परिस्थितीला कारण मात्र सर्वस्वी शेतकरी वर्ग नव्हे. जवळ थोडा जास्त पैसा असला तर त्याची बचत करावी, तो बँकेंत टाकावा किंवा औद्योगिक कंपन्यांच्या शेअर्समध्यें गुंतवावा अशी उत्तेजनपर परिस्थिति हिंदच्या खेडेगांवांतून नाहीं. गेल्या ९० वर्षांत झालेल्या औद्योगीकरणामुळें लक्षावधी खेड्यांतील परिस्थिति, वहातुकीचीं साधनें व बाजाराचें बदललेलें स्वरूप या व्यतिरिक्त बदललेली नाहीं. म्हणजेच, खेडेगांवांतून शेतकऱ्यांना सोईस्कर अशा बँका नाहींत, पोस्टल सेव्हिंगचीहि विशेषशी सोय नाहीं, जपानप्रमाणें यांत्रिक शक्तीवर चालणारे ग्रामीण कारखाने नाहींत. बँकिंग व विमा ह्या गोष्टींचा प्रचार खेडेगांवांतून त्वरित झाला पाहिजे व याचबरोबर यांत्रिक शक्तीवर चालणारे लहान लहान समाईक भांडवलाच्या पद्धतीनें चालणारे कारखाने निघाले पाहिजेत. याप्रमाणें वातावरण बदलेल तरच शेतकरी वर्ग बचत करून अल्प प्रमाणांत उद्योगधंद्यांत भांडवलहि गुंतवावयास तयार होईल. तरी बँकिंग कंपन्यांना खेडेगांवांतून शाखा उघडण्यासाठीं सरकारनें उत्तेजन दिलें पाहिजे.

विमा उतरण्याची संवय अद्याप खेडेगांवांतून पसरलेली नाहीं. विमा आकर्षक करण्यासाठीं रु.२५०, रु. ५०० असे लहान विमे उतरविण्याची सोय करण्यांत आली पाहिजे. आयुर्विमा कंपन्यांनीं खेडेगांवांतून हिंडून प्रचार करणारे विमा–विक्रेते नेमले पाहिजेत. एखाद्या मोठ्या खेडेगांवांतहि विमा कंपनीला स्वतंत्र ब्रँच ऑफिस उघडणें परवडणार नाहीं; परंतु कांहीं खेडेगांवांच्या गटासाठीं स्वतंत्र प्रचारक व विमा विक्रेता नेमतां येईल.

पुष्कळ खेडेगांवांतून जपानप्रमाणें लहान लहान कारखाने सुरू करतां येतील. अशा कारखान्यांचें भांडवल नजीकच्या खेडेगांवांतूनच उभारलें गेलें पाहिजे. असें झालें म्हणजे उद्योगधंद्यांत थोडथोडें भांडवल गुंतविण्याची प्रवृत्ति आपोआपच निर्माण होईल. पुष्कळ खेडेगांवांतून फुरसतीच्या महिन्यांत मुंबईसारख्या औद्योगिक शहरांत कारखान्यांत हंगामी नोकरी करण्यासाठीं शेतकरी लोक येतात. ही प्रवृत्ति असे छोटे कारखाने निघाले असतां बंद होईल, व त्यामुळें मुंबईसारख्या शहरांत कारखान्यांत काम करणाऱ्या कामगारांचें हजेरीचें प्रमाण जास्त स्थिर राहील.

वाहातुकीचीं साधनें व बाजारपेठेचें बदललेलें स्वरूप एवढ्याच शहरी वातावरणाच्या गोष्टी खेडेगांवांत थोड्या प्रमाणांत सुरू झाल्या आहेत. परंतु बँका, विमा विक्रेते, छोटे समाईक भांडवलावर चालणारे कारखाने अशाहि गोष्टी खेडेगांवांतून सुरू झाल्या तरच आर्थिक जीवन सुधारण्याच्या दृष्टीनें अनुकूल वातावरण निर्माण होऊं शकेल. या कामांत सरकारची मदत पाहिजे, त्याचप्रमाणें उत्साहानें खेडेगांवांत राहून काम करावयास तत्पर असे धंद्याची दृष्टि असलेले तरुण निर्माण झाले पाहिजेत. ही गोष्ट प्रयत्नांनीं शक्य होणारी आहे. विशेषतः अशा कामीं प्रथम शहरांत रहाणाऱ्या तरुण व्यापाऱ्यांनीं व कारखानी–वृत्तीच्या माणसांनीं लक्ष घातलें पाहिजे.

यापुढें सरकारी धोरणामुळें हिंदमधील शेतकऱ्याची परिस्थिति निश्चित सुधारत जाईल, कायम जमीनदारी पद्धतीचें उच्चाटन, कुळ–कायदे, खोती पद्धतीचें उच्चाटन, शेत कसणारालाच शक्य तितकें जमिनीचे मालक करणें, जास्तींत जास्त किती शेत जमीन एका व्यक्तीला ठेवतां येईल याची मर्यादा, जमिनीचे लहान लहान तुकडे पाडण्याला प्रतिबंध, शेतीच्या तुकड्यांचें एकीकरण, धान्याच्या बाजारभावावर नियंत्रण इ० सर्व सुधारणा शेतकरी वर्गाची आर्थिक परिस्थिति सुधारावयास मदत करतीलच. परंतु त्याच बरोबर शेतकरी वर्गाला हिंदच्या अर्थव्यवस्थेचा भरदार घटक बनवावयाचें असेल तर खेडेगांवांतून आजच्या आर्थिक जीवनाला पोषक असें वातावरण निर्माण झालें पाहिजे. बँका, विमा, लहान कारखाने या गोष्टी अद्याप खेडेगांवांतून सुरू झालेल्या नाहींत. ह्या सर्व संस्थांना पोषक असें वातावरण प्रत्येक जिल्ह्यांत ठिकठिकाणीं आढळून येतें. सारांश, औद्योगिक विकासाच्या योजना आतां खेडेगांवच्या उन्नतीच्या दृष्टीनें सुरू झाल्या पाहिजेत. साक्षरतेचा प्रसार, सरकारनें सुरू केलेलीं फिरतीं वाचनालयें, सहकारी चळवळीचा प्रसार इ. गोष्टी खेडेगांवांत अनुकूल पार्श्वभूमि निर्माण करावयास मदत करतील.

---

## हिंदी रेल्वेजचा १९४८-४९ मधील कारभार

| | |
|---|---|
| वहातुकीचें उत्पन्न : | २१३·१० कोटी रु. |
| पैकीं उतारू वहातुकीचें उत्पन्न : | ८३·८३ कोटी रु. |
| मालवहातुकीचें उत्पन्न : | १०८·२९ कोटी रु. |
| कारभारविषयक खर्च : | १६०·४१ कोटी रु. |
| घसारा : | ११·२९ कोटी रु. |
| निव्वळ उत्पन्न : | ४२·३४ कोटी रु. |
| दिलेलें व्याज : | २२·३६ कोटी रु. |
| राहिलेला नफा : | १९·९८ कोटी रु. |
| उतारूंची ने-आण : | ११८ कोटी, ६ लक्ष उतारू. |
| वाहिलेला माल : | ८ कोटी, २६ लक्ष टन |
| उतारूकडून दरमैली उत्पन्न : | ४·६ पै. |
| दर टन मालावर दर मैली उत्पन्न : | ९·५ पै. |
| मार्च १९३९ अखेर रेल्वेंत गुंतलेलें भांडवल : | ७७५·७७ कोटी रु. |
| पैकीं भारत सरकारचें | ६९९·७८ कोटी रु. |
| संस्थानें वगैरेंचें : | २·११ कोटी रु. |
| एकूण खरेदी : | १००४ कोटी रु. |
| नवीन मार्ग सुरू : | १५७·८२ मैल. |
| माल वहातुकींत कोळशाचें प्रमाण: | ४३·६% |
| अन्नधान्याचें प्रमाण: | १०·९% |
| गळिताच्या धान्याचें प्रमाण: | २·५% |
| हंगामी नोकरांची संख्या: | ९,१२,७२४ |
| नोकरांचा पगार, भत्ता. इ. : | ८२·५ कोटी रु. |
| अन्नधान्याच्या दुकानांवरील खर्च: | २८·८ कोटी रु. |
| अन्नधान्याचीं दुकानें: | ५८९ |
| शिफारसपत्रकें: | ६,१३,००० |

रहदारीचें प्रमाण वाढलें असून मिळकतींत वाढ झाली आहे आणि कारभारहि अधिक कार्यक्षम झाला आहे. वहातुकींतील अडथळे ही वर्षाच्या प्रारंभीं नित्याची बाब होती, ती वर्षअखेर बहुतांशीं दूर झालेली आहे.

---

## गोवर्धन डेअरी फार्म्स लि., पुणें १

अहवालाचे वर्षी ( ३१-८-१९४९ अखेर ) कंपनीस ४,२७१ रु. १४ आ. ८ पै निवळ नफा झाला. त्यांतून प्रेफरन्स भागांस ६% व ऑर्डिनरी भागांस ४% डिव्हिडंड देण्यांत आलें. त्यास ४,२७१ रु. लागले. सन १९४७ सालीं कंपनीनें श्रीगोवर्धन संस्था, पुणें यांचेकडून १० एकर जमीन खरेदी केली होती. त्यांतील ४ एकर, २७ गुंठे इतक्या क्षेत्रांत गोवर्धन कॉलनी प्रस्थापित केली आहे. ह्या सोसायटीनें हें सर्व क्षेत्र ८१,८५९ रु. ला खरेदी घेण्याचें कबूल केलें आहे. कंपनीच्या ताळेबंदांतील मालकीच्या जमिनीची खरेदी किंमत लक्षांत घेतां, ह्या व्यवहारामुळें कंपनीची आर्थिक परिस्थिति चांगली मजबूत होत आहे. गायींच्या दुधाचा पुरवठा ज्यास्त प्रमाणांत व्हावा म्हणून मुंबई सरकारनें दुभत्या गायी विकत घेणें, गोशाळा, प्रसूति शाळा, वत्सशाळा बांधणें, इत्यादि कामाकरितां ५० हजार रु. चें कर्ज मंजूर केलें आहे. कंपनीचें वसूल भांडवल १,०५,०१५ रु. असून एकूण ताळेबंद २,२७,८९७ रु. चा आहे. कंपनीला दूध व शेतमाल विक्रीचे २८,८४१ रु. मिळाले व शिल्लक चारा १०,००० रु. चा आहे. भांडवली खर्चापैकीं इमारतीवर २½% प्रमाणें १,०७६ रु. घसारा काढलेला आहे. कंपनीची वार्षिक सभा ३१-१२-४९ रोजीं झाली. सरदार खं. रा. विंचूरकर हे कंपनीचे अध्यक्ष असून मेसर्स सालपूरकर आणि डोणवाड ह्यांचेकडे मॅनेजिंग एजन्सी आहे.





भोर स्टेट बँक लि.

मुख्य कचेरी:–भोर, जि. पुणें.

शाखा:–पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ६७,००० |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. त्र्यं. शिंगरे, अध्यक्ष.
न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. वृ. खोले.
श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल. बी.
श्री. बा. ग. भुंडके.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्ष मुदतीसाठीं कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी

पुणें कचेरी ५१५ बुधवार

अधिक माहितीसाठीं लिहा.
रा. गो. आगाशे, बी. ए. ( ऑ. )
मॅनेजर.

Dr. WAMAN GOPAL'S SARSAPARILLA
BEST BLOOD PURIFIER





हें पत्र पुणें, पेट भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं ' दुर्गाधिवास ', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.